तक्ता अ

**- : जाहीर नोटीस :-**

अर्थ व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय,सोलापूर,

**जा.क्र. /४७७७/ 2025, दि. २६/१२/ 2025.**

जिल्हा न्यायालय, सोलापूर संकुलनामध्ये प्रस्थापीत सी.सी.टी.व्ही. प्रणालींच्या तपासणी व दुरुस्ती करीता अधिकृत विक्रेते व सेवा पुरवठादार यांच्यामार्फत दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

## नियम व अटी

१. **जिल्हा न्यायालय, सोलापूर संकुलामध्ये प्रस्थापित सी.सी.टी.व्ही. प्रणालींच्या तपासणी व दुरुस्तीसाठी अधिकृत** विक्रेते व सेवा पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागविण्याकरिता ही जाहीर टेंडर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (०७) दिवसांच्या आत, म्हणजेच दि. ०३ / ०१ / २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ०४.३० वाजेपर्यंत, मोहोरबंद निविदा मा. प्रबंधक कार्यालय, जिल्हा न्यायालय, सोलापूर येथे सादर कराव्यात.

२. सदर मोहोरबंद लखोट्यावर **"QUOTATION FOR CCTV REPAIRS"** असे स्पष्टपणे नमूद करावे.

३. सी.सी.टी.व्ही. प्रणालीच्या तपासणीकरिता कोणत्याही प्रकारची फी अदा केली जाणार नाही. निविदा सादर करणे तसेच दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य कार्यालयापर्यंत पोहोचविणे इत्यादी सर्व बाबी निविदादारास स्वखर्चाने कराव्या लागतील. सदर बाबींवरील खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

४. दरपत्रकांमध्ये सी.सी.टी.व्ही. प्रणालीचा तपासणी अहवाल तसेच आवश्यक नादुरुस्त झालेल्या साहित्याचे दर (मजुरी व सेवाखर्चासह) स्पष्टपणे नमूद करावेत.

५. निविदादारांनी दरपत्रक सादर करताना त्यावर GST/SGST नोंदणी क्रमांक नमूद केलेला असावा. तथापि, GST/SGST लागू नसल्यास संबंधित प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमूद असलेले निविदादाराच्या लेटरहेडवरील दरपत्रक ग्राह्य धरले जाईल.

६. दरपत्रक सर्व करांसह सादर करावे. मात्र GST लागू असल्यास त्याचा स्वतंत्र दर नमूद करावा. तसेच महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास शासनाच्या तरतुदीनुसार दिल्या जाणाऱ्या सवलतींच्या अटींअधीन राहून दरपत्रक सादर करावे. बिलाची रक्कम अदा करताना नियमानुसार TDS कपात करण्यात येईल.

७. सी.सी.टी.व्ही. प्रणालीची तपासणी ही केवळ कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.३० ते सायं. ०५.००), सुट्टीचे दिवस वगळून, कार्यालयात उपस्थित राहूनच करावयाची आहे.

८. तपासणी अहवाल व प्राप्त दरपत्रके मंजूर करण्याचा अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सोलापूर यांनी स्वतःकडे राखून ठेवलेला आहे.

आदेशावरुन,

सहा. अधिक्षक,

प्रबंधक

जिल्हा न्यायालय, सोलापूर